साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), मुंबई

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

मुख्य कार्यालय :- नवीन प्रशासकीय इमारत क्र.१, ७ वा मजला,
रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पूर्व), मुंबई -४०० ०७१

दूरध्वनी :- ०२२ - २५२२०००२ फॅक्स नं :- ०२२ - २५२७४०७१

E-mail : lasdcmumbai@gmail.com / lasdc@rediffmail.com


वाचा :- १. दि. ०८ ऑगस्ट, २०२३ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या १०३ व्या बैठकीतील ठराव क्र.१०३/१८.

२. कार्यालयीन मंजुर टिप्पणी दि. --/--/२०२३.

जा.क्र.एसएलएएसव्हीएम/व्यसं/प्रशा/एचओ-२७०३/२०२३-२४ दि.१४/०९/२०२३.

७५

## परिपत्रक

वाचा क्र.१ अन्वये महामंडळाच्या आस्थापनेवर विविध संवर्गाच्या पदावर कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची निरंतर सेवा झाल्यानंतर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ पोटनियम १० (१) अन्वये वयाची ५८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर नियत वयोमानानुसार महामंडळाच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांची त्या त्या पदाची सेवा समाप्त करण्यात येते.

अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या जीवनातील महत्वाचा व खुप मोठा कालावधी महामंडळाच्या मुख्य/प्रादेशिक/जिल्हा कार्यालयाच्या सेवेत व्यतित झाल्यामुळे सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचा ऋणानुबंध म्हणून सपत्नीक निरोप समारंभाचा सत्कार सोहळा आयोजित करुन महामंडळाच्या संचालन व प्रशासन खात्यामधून रु. १०,०००/- (अक्षरी रु. दहा हजार मात्र) सपत्नीक पेहरावासह (साडी,चोळी, शर्ट-पॅन्ट, शॉल, श्रीफळ व अल्पोपहार) इ.करिता खर्च करण्यास मुख्य स्तरावर महाव्यवस्थापक यांना तसेच प्रादेशिक व जिल्हा स्तरावर प्रादेशिक व्यवस्थापक व जिल्हा व्यवस्थापक यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

सेवा निवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचा "सेवापूर्ती गौरव सोहळा" साजरा करण्याकरिता आवश्यक असलेला रु. १०,०००/- (अक्षरी रु. दहा हजार मात्र) चा निधी प्रादेशिक व्यवस्थापक यांचेमार्फत मुख्य कार्यालयास प्रस्ताव सादर करावा. मुख्य कार्यालयाकडून प्रादेशिक/जिल्हा कार्यालयांना उपलब्ध करुन दिलेल्या निधीच्या खर्चाची नोंद रितसर लघुरोकडकिर्द वही मध्ये घेऊन मासिक खर्च अहवालामध्ये सदरचा खर्च प्रादेशिक व्यवस्थापक यांचेमार्फत मुख्यालयास सादर करावा.

(मनिष ग.सागळे)
व्यवस्थापकीय संचालक

प्रति,

१. उपमहाव्यवस्थापक, (प्रशा/प्रकल्प/वित्त/वसुली व लेखे) सा.लो.अ.सा.वि.म.(मर्या.) मुख्य कार्यालय, मुंबई.

२. प्रादेशिक कार्यालय, सा.लो.अ.सा.वि.म.(मर्या.) मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/लातुर/अमरावती/नागपूर.

३. जिल्हा कार्यालय, सा.लो.अ.सा.वि.म.(मर्या.) सर्व...........

४. कार्यालयीन प्रत.